# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक 28/07/2023 (शुक्रवार) सायंकाळ**

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील एम. आय. डी. सी. चौक बोरी इंडियन पट्रोलपंप जवळ एम. आय. डि. सी येथे दिनांक २६/०७/२०२३ चे २२.३० ते २२.४० वा. सुमारास यातील मृतक हा त्यांची मोटरसायकल एम. एच ४०/सी. के. —५३६४ ने फिर्यादी नामे— किशोर श्रीराम चौधरी, वय ४१ वर्ष, रा. राजगड विरू नगर झॉसी जि. झॉसी राज्य उत्तर प्रदेश ह. मु. टेंभरी राष्ट्रपाल कॉलनी ता. हिंगणा जि. नागपुर यांचे घरी टेंभरी येथे जात असताना इंडियन पट्रोलपंपाचे जवळ एक ट्रेलर नं. यु. पी.— ७०/एच. टि.— ४४५७ च्या चालकाने मोटरसायकलला मागुन धडक मारल्याने मोटरसायकल चालक नामे— धमेंद्र श्रीराम चौधरी, वय ३२ वर्ष याला जबर मार लागुन जखमी झाल्याने त्याला उपचाराकरीता माया हॉस्पीटल बुट्टीबोरी येथे नेले असता उपचारा दरम्यान तेथील डॉक्टरांनी तपासुन मोटरसायकल चालक याला मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी ट्रेलर चालकाविरुध्द कलम २८३, ३०४ (अ) भादवी सहकलम १३४/१७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक ठाकुर पोस्टे बुट्टीबोरी मो. नं. ९८५०२७८१२३ हे करीत आहे.

### नरखेड पोलीसांनी अवैध गोवंश वाहतुक करणारा पिकअप वाहन पकडून ०८ गोवंश यांना दिले जिवनदान

दिनांक २७/०७/२०२३ रोजी पोलिस स्टेशन नरखेड येथील पोलीस स्टाफ पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, नरखेड ते खंडाळी रोड येथून जनावर वाहतुक करणारा एक इसम हा आपल्या वाहनामध्ये अवैधरीत्या जनावरांची वाहतुक करीत आहे. अशा माहिती वरून नरखेड ते खंडाळी रोड येथे नाकाबंदी लावली असता पिकअप वाहन क्र. एम. एच.— ४०/सी. एम.— २९९६ चा चालक आरोपी नामे— जगदिश मनोहर तुमडाम, वय ३२ वर्ष केदारपुर त. काटोल त्याचे ताब्यातील पिकअप वाहनामध्ये ०८ गोरे गोवंश (जनावरे) अवैधरित्या कोंबुन दोरीच्या साहयाने त्यांचे पाय व शिंगे बांधुन घेवुन जात असतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन ०८ गोरे गोवंश (जनावरे) किंमती अंदाजे ८५,०००/— रू व पिकअप वाहन क्र. एम. एच.— ४०/सी. एम.— २९९६ किंमती अंदाजे ४,००,०००/— रू असा एकुण ४,८५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि अक्षय ठाकरे, पोस्टे नरखेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ११, (१) (डी) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधिनियम १९६०, सहकलम ५ (ए), ५(बि), ९ पशु संरक्षण अधिनियम, सहकलम ११९ म.पो.का कादयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक गजानन तितरे मो. नं. ८९९९०९४२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**